RNI No. : MAHMAR/2009/30923 | मुंबई, फेब्रुवारी २०२५

मराठी माणसाचा मानबिंदू...

# जागता महाराष्ट्र

वर्ष : १६ | अंक : २ | संपादक - बाळू जाधव | पृष्ठ : ८ | मूल्य : ३ रुपये

‘जागता महाराष्ट्र’मध्ये बातमी व जाहिराती प्रकाशित करण्यासाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

मो. ९१३७७७८०६४

Email: jagtamaharashtra@gmail.com

# सानपाडा अंडर पास सर्व्हिस रोड ते तुर्भे नाका कॉंक्रिटीकरणात दिरंगाई व भ्रष्टाचार


- संबंधित ठेकेदार कंपनीने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचेही आले समोर
- संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा आणि दोषी ठेकेदाराची कंपनी काळ्या यादीत टाका
- वेळेत काम पूर्ण होत नसल्याने नागरिकांना वाहतूक कोंडीचा नाहक त्रास








सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार अशोक वैद्य व बाळकृष्ण जाधव यांची मागणी


टीप- सदर कामाचे फोटो जोडत आहेत.

प्रत रवाना :-
१) मा.आयुक्त साहेब नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय बेलापूर नवी मुंबई
२) मा.उपायुक्त साहेब.परी-। नवी मुंबई महानगरपालिका बेलापूर नवी मुंबई
३) मा.अतिरिक्त आयुक्त(शहर) नवी मुंबई महानगरपालिका बेलापूर नवी मुंबई
४) मा.कार्यकारी अभियंता [illegible] मुंबई - ४००७०३
५) मा.सहाय्यक आयुक्त डी.विभाग सेक्टर -१० सानपाडा नवी मुंबई - ४००७०३

**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिकेच्या बी विभाग नेरूळ अंतर्गत सानपाडा गाव अंडर पास सर्व्हिस रोड ते तुर्भे नाका येथे सुरू असलेल्या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणावर दिरंगाई आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. या प्रकरणात स्थापत्य उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांनी संबंधित ठेकेदार कंपनीला अभय दिल्याचा आरोप तक्रारदार अशोक वैद्य यांनी केला आहे.

नेरूळ विभागातील सानपाडा अंडरपास ते तुर्भे नाका या मार्गावर रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामात अत्यंत ढिसाळपणा दाखवण्यात आला असून, नियोजित वेळेत काम पूर्ण होत नसल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी आणि गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

तक्रारकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकल्पात गुणवत्तेशी तडजोड करण्यात आली असून निधीचा गैरवापर झाल्याची शक्यता आहे. संबंधित ठेकेदार कंपनीने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर नामे कार्यकारी अभियंता उमेश पाटील, उपअभियंता कल्याण कुलकर्णी (स्थापत्य), अभियांत्रिकी विभाग कनिष्ठ अभियंता भागवत ओलेकर (स्थापत्य) यांच्यावर कारवाई करण्यात यावी, तसेच संबंधित ठेकेदार कंपनीला काळ्या यादीत समाविष्ट करण्याची मागणी होत आहे.

या प्रकारामुळे पुन्हा एकदा महानगरपालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय आणि अपारदर्शक व्यवहार यामुळे नागरिकांच्या सुविधांवर परिणाम होत आहे. तज्ज्ञांच्या मते, यासारख्या प्रकरणांवर कठोर कारवाई झाली तरच भविष्यात अशा भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो.

## कार्यकारी अभियंत्यांचे आश्चर्यजनक उत्तर!

नवी मुंबई महानगरपालिका कार्यकारी अभियंता यांनी अकलेचे तारे तोडले त्यांना तक्रार संबंधित विचारणा केली असताना ते म्हणाले, ठेकेदार कोणत्या मुडमध्ये असेल म्हणून साईट व्हीझीट करीत नाही. तुम्हांला साईटवर बोलवतो तुम्ही कामासंदर्भात त्रुटी सांगा. जर का तक्रारदार साईट व्हीजिट दरम्यान ठेकेदारांकडून तक्रारदारांना जीवितहानी झाल्यास कार्यकारी अभियंता उमेश पाटील जबाबदार असतील का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## नागरिक आक्रमक, प्रशासनाने दिली चौकशीची ग्वाही

या भ्रष्टाचाराच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सानपाडा येथील रहिवाशांनी पालिका प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप करत त्वरित कारवाईची मागणी केली असून काही सामाजिक कार्यकर्त्यांनीही या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी निवेदन दिले आहे. नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कार्यकारी अभियंता उमेश पाटील यांनी लवकरात-लवकर ठराविक कालावधीमध्ये ठेकेदारांकडून कामे करून घेतली जाईल व त्यांना दंडात्मक कारवाई करण्याचे आश्वासन व तक्रारांची दखल घेत चौकशीचे आदेश दिले असल्याचे सूत्रांकडून समजते. दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर आणि ठेकेदार कंपनीवर कठोर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# कॅन्सर सारख्या आजारांना कारणीभूत असलेल्या चहाच्या कागदी कपावर त्वरीत बंदी घाला

## माहिती अधिकार कार्यकर्ता बाळकृष्ण जाधव व अशोक वैद्य यांची मागणी




**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

**मुंबई – कॅन्सर सारख्या आजारांना कारणीभूत असलेल्या चहाच्या कागदी कपावर त्वरीत बंदी घालून बीपीए आणि मायक्रो प्लास्टिकचा आरोग्यावर होणारा परिणाम यावर आधारित शास्त्रीय डेटा आणि अन्य स्थानिक आरोग्य अहवालांचा परिपत्रक जारी करण्यात यावे, अशा आशयाची मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता बाळकृष्ण जाधव व अशोक वैद्य यांनी मा. उपायुक्त परी.-५, एम/पश्चिम विभाग कार्यालय, नटराज सिनेमा जवळ, चेंबर (पूर्व) यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

चहाचे कागदी कप बनवितांना त्यामध्ये बीपीए नामक केमिकलचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो. सदर कागदी कपात गरम चहा किंवा पाणी टाकल्यास कपाच्या आतील मायक्रो प्लास्टिक वितळते आणि चहा घेतल्याने लाखो मायक्रो प्लॉस्टीकचे कण पोटात जातात. ज्यामुळे हजारो नागरिकांना कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागत असल्यामुळे चहाच्या कागदी कपांवर बंदी घालावी, अशी मागणी होत आहे.

सर्वत्र चहाचे दुकाने एम/पश्चिम विभागात चौका चौकात मोठ्या प्रमाणात आहेत, ग्राहक नागरीक मोठ्या प्रमाणात चवीने चहा पितात. गरम-गरम चहा हा कागदी कपात दिल्या जातो व त्या कागदी कपाचे आतील आवरणात प्लास्टिक आणि रसायनाचा वापर करुन डिस्पोजेबल कप तयार केले जातात. गरम पेय टाकल्यामुळे आतील प्लास्टिकचे विघटन होउन त्याचे कण चहा व ईतर गरम पेयात येतात व ते पेय पिणाऱ्यांच्या शरीरात जातात. यामुळे कागदी कपात चहा किंवा गरम पेय पिल्यास कर्करोग होऊ शकतो. दीर्घकाळ या कपाचा वापर करत राहिले तर कर्करोग होऊ शकतो अशा बातम्या वृत्तपत्रात वाचण्यात आल्या.

तसेच बातम्यात डॉक्टर यांनी सांगितले की बिस्फेनॉल आणि BPA सारखी रसायने आढळतात ही अत्यंत घातक रसायने आहेत या कपमध्ये चहा किंवा गरम पाणी प्यायल्यास त्यातील रसायने त्यामध्ये विरघळतात आणि ही रसाने पोटात पोहोचतात त्यामुळे क्षय रोगाचा प्रसार कमी होऊन कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात शहरात प्रसार होत आहे. तरी आपण आरोग्य अधिकारी या नात्याने जनहितार्थ कागदी कप बंद करून आपल्या विभागामध्ये आदेश पारीत करावे, आपण सुध्दा चेंबूर एम/पश्चिम विभागामध्ये कागदी कपावर बंदी आणून चहा चीनी माती, काचेचा ग्लास कुल्ल्हड इत्यादिमध्ये देण्याबाबत निर्णय घेऊन कॅन्सर सारख्या बीमारीपासून नागरिकांचा बचाव करावे, अशी पत्रकार व माहिती अधिकार कार्यकर्ता यांच्या वतीने मागणी करण्यात येत आहे.



O/C

दिनाक: ०४/०२/२०२५

प्रति,
मा.उपायुक्त परी-५
एम/पश्चिम विभाग कार्यालय
नटराज सिनेमा जवळ चेंबूर पूर्व
मुंबई -४०० ०७१

अर्जदार: श्री.बाळकृष्ण सावळेराम जाधव.(पत्रकार) माहिती अधिकार कार्यकर्ता
श्री.अशोक वामनराव वैदय.(पत्रकार) माहिती अधिकार कार्यकर्ता
मो.९१३७७७८०६४/७३०४६८४२६४

विषय :- कॅन्सर सारख्या आजरांना कारणीभुत असलेल्या चहाच्या कागदी कपांवर त्वरीत बंदी घालण्याचे आदेश निर्गमित करुन कार्यवाही करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने चहाचे कागदी कप बनवितांना त्यामध्ये बीपीए नामक केमिकल चा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो. सदर कागदी कपात गरम चहा किंवा पाणी टाकल्यास कपाच्या आतील मायक्रो प्लास्टिक वितळते. आणि चहा घेतल्याने लाखो मायक्रो प्लॉस्टीकचे कण पोटात जातात. ज्यामुळे हजारो नागरिकांना कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागत असल्यामुळे चहाच्या कागदी कपांवर बंदी घालण्या बाबत. की , चहा हे मुख्य पेय झाले आहेत. व सर्वत्र चहाचे दुकाने एम/पश्चिम विभागात चौका चौकात मोठया प्रमाणात आहेतं. ग्राहक नागरीक मोठया प्रमाणात चवीने चहा पितात गरम गरम चहा हा कागदी कपात दिल्या जातो. व त्या कागदी कपाचे आतील आवरणात प्लास्टिक आणि रसायनाचा वापर करुन डिस्पोजेबल कप तयार केले जातात. गरम पेय टाकल्यामुळे आतील प्लास्टिक चे विघटन होउन त्याचे कन चहा व ईतर गरम पेयात येतात व ते पेय पिनाऱ्यांच्या शरीरात जातात. यामुळे कागदी कपात चहा किंवा गरम पेय पिल्यास कर्करोग होऊ शकतो. दीर्घकाळ या कपाचा वापर करत राहिले तर कर्करोग होऊ शकतो अशा बातम्या वृत्तपत्रात वाचण्यात आल्या. तसेच बातम्यात डॉक्टर यांनी सांगितले की बीस्फेनॉल आणि BPA सारखी रसायने आढळतात ही अत्यंत घातक रसायने आहेत या कप मध्ये चहा किंवा गरम पाणी प्यायल्यास त्यातील रसायने त्यामध्ये विरघळतात आणि ही रसाने पोटात पोहोचतात त्यामुळे क्षय रोगाचा प्रसार कमी होऊन कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात शहरात प्रसार होत आहे तरी आपण आरोग्य अधिकारी या नात्याने जनहितार्थ कागदी कप बंद करून आपल्या विभागामध्ये आदेश पारीत करावे. आपण सुध्दा चेंबूर एम/पश्चिम विभागामध्ये कागदी कपावर बंदी आणून चहा चीनी माती, काचेचा ग्लास कुल्ल्हड इत्यादि मधे देण्याबाबत निर्णय घेऊन कॅन्सर सारख्या बीमारी पासून नागरिकांचा बचाव करावे अशी पत्रकार व माहिती अधिकार कार्यकर्ता यांच्या वतीने मागणी करण्यात येत आहे .

आपला विश्वासू

श्री.बाळकृष्ण सावळेराम जाधव.(पत्रकार)　　श्री.अशोक वामनराव वैदय.(पत्रकार)

प्रत रवाना:
१) मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी एम/पश्चिम विभाग कार्यालय चेंबूर पूर्व मुंबई - ७१

04 FEB 2025
15941
11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18

स्विकारले
04 FEB 2025
चेंबूर

---

# सहाय्यक अभियंता संतोष निकाळजे यांच्या बदली संदर्भात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करा




**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

मुंबई - बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक अभियंता संतोष निकाळजे यांच्या बदली संदर्भात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी जनतेची मागणी जोर धरत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पश्चिम विभागातील सहाय्यक अभियंता श्री. संतोष निकाळजे यांच्या कामकाजावर शंकेचे बोट ठेवले आहे. त्यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी तीन वर्षांहून अधिक कालावधीपर्यंत कार्यरत असतानाही प्रशासनाला बदली संदर्भात अर्ज सेवा सातत्य मान्यता घेतली नाही बेकायदेशीरपणे कार्यरत राहिले.

५ ऑक्टोबर २०२१ पासून एम/पश्चिम विभागात सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत असलेले श्री. निकाळजे यांनी कोणतीही सेवा सातत्य मान्यता घेतली नाही. त्यांचे कार्यालयीन अभिलेख यावरून दावा करत आहेत की, त्यांनी कामकाजाच्या पारदर्शकता नाही म्हणून तात्काळ त्यांची बदली करण्यात यावी, असे मागणी करणारा एक पत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच, मनपा अधिनियम १८६० आणि भारतीय दंड संहिता अंतर्गत त्यांच्यावर दखलपात्र फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे आणि संबंधित अधिकारी यावर कार्यवाही करत आहेत.

---

# निवडणूक आयोगाला कोर्टाने बजावली नोटीस

- वाढीव मतदानाचे द्यावे लागणार उत्तर!
- हायकोर्टात १७ फेब्रुवारीला सुनावणी

मुंबई - महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून आजही संशय व्यक्त केला जात आहे. निवडणुकीत वाढलेल्या मतदानावरून आयोगाकडून अजूनही खुलासा झालेला नाही. अशातच वंचित आघाडीचे सर्वेसर्वा आणि ॲड प्रकाश आंबेडकर यांनी दाखल केलेल्या याचिकेची दखल हायकोर्टाने घेतली आहे. हायकोर्टाने केंद्रीय निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना नोटीस बजावली असून २ आठवड्यात खुलासा सादर करावा असे निर्देश कोर्टाने दिले आहे.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अखेरच्या टप्प्यात मतदान कसे वाढले याबद्दल हायकोर्टात याचिका दाखल आहे. न्यायमूर्ती अजय गडकरी, न्यायमूर्ती कमल खाता यांच्या द्विसदस्य खंडपीठासमोर सुरू सुनावणी आहे. सुनावणी दरम्यान, एका आरटीआयमध्ये निवडणूक आयोगाकडे तशी मागणीही झाली होती. पण महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये ७६ लाख मतांचा डेटा आमच्याकडे उपलब्ध नाही, असे उत्तर केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले होते.

एवढंच नाहीतर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत झालेल्या ७६ लाख मताचा डाटा अर्थात केंद्रीय निवडणूक आयोगाकडे उपलब्ध नाही, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे वाढलेले ७६ लाख मतांचा हिशेब नाही का? असा सवाल ॲड प्रकाश आंबेडकर यांनी केला.

निकालाची घोषणा करताना मतांची जुळवणी व्हायला हवी. ती झाली असेल तर सर्व निवडणूक आयोगाकडे पाठवायला हवी. जिकडे मते जुळत आहे का याचा रेकॉर्ड आयोगाला पाठवावे. यासाठी हायकोर्टाने निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. २ आठवड्यात उत्तर द्यावे लागणार आहे. ही नोटीस निवडणूक आयोगाचे आयुक्तांना बजावली आहे.

# पालिकेचे वसाहत अधिकारी मोहम्मद हनीफ शेख यांच्याकडून अनधिकृत बांधकामांना संरक्षण

## वसाहत अधिकारी यांचे निलंबन करून सखोल चौकशी करा





**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

मुंबई - मुंबई महापालिकेच्या वसाहत अधिकारी मोहम्मद हनीफ शेख भ्रष्टाचार आणि अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत आहे. मोठ्या प्रमाणात निवासी बांधकामांना अनिवासी स्वरूपात अनधिकृत बांधकाम करणे, त्यांना फोटोपास देणे याबाबत आर्थिक वसुली करीत आहेत, त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे.

शिवाजी नगर, गोवंडी-मुंबई महापालिकेच्या एम/पूर्व विभागातील वसाहत अधिकारी मोहम्मद हनीफ शेख मागील ४ वर्षांपासून एकाच विभागात कार्यरत असून याच्यावर पत्रकार आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या सामाजिक कार्यकर्ता यांनी अनधिकृत बांधकामांसाठी संरक्षण देण्याचा आणि संबंधित ठेकेदारांशी आर्थिक देवाण-घेवाण करून तडजोड करण्याचा आरोप केला आहे.

आरोपानुसार, मोहम्मद हनीफ शेख हे शिवाजी नगर आणि बैगंनवाडी


मध्यवर्ती टपाल केंद्र
मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन दिनांक :०४/०२/२०२५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
अ.क्र. ५/२/२०२५
दिनांक:-

प्रती,
श्री.मा.देवेंद्र फडणवीस साहेब
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

प्रती,
मा.मनपा आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका
मुख्यालय फोर्ट मुंबई -४०० ००१

बृ.म.पा. आयुक्तांचे कार्यालय
5 FEB 2025
बृहन्मुंबई महानगरपालिका

अर्जदार : श्री.बाळू सावळेराम जाधव.(पत्रकार) माहिती अधिकार कार्यकर्ता.
श्री.अशोक वामनराव वैदय.(पत्रकार) माहिती अधिकार कार्यकर्ता.
संदर्भ: मा.मनपा उप आयुक्त परी-५ दि.०८ /०१/२०२५ रोजी दिलेले पत्र
मा.सहाय्यक मनपा आयुक्त एम/पूर्व विभाग दि.०२/०१/२०२५ रोजी दिलेले पत्र

स्मरण पत्र.

**विषय: मनपा एम /पूर्व विभाग वसाहत अधिकारी मोहम्मद हनीफ शेख हे आपल्या विभागातील अंतर्गत अनधिकृत निवासी बांधकामांना अनिवाशी स्वरूपात करण्यासाठी खुले संरक्षण देऊन नोटीसीचा धाक दाखून मोठ्या प्रमाणात आर्थिक वसुली करीत असल्याने त्यांच्यावर मनपा अधिनियम अंतर्गत कार्यवाई करून निलंबित करण्यात यावे.**

मा महोदय,

वरील विषयाच्या अनुशंगाने आपल्या निदर्शनास आणू इच्छितो कि मोहम्मद हनीफ शेख एम/पूर्व विभाग मध्ये सुमारे ५ वर्षपासून एम/पुर्व विभागात (वसाहत अधिकारी ) पदावर कार्यरत आहेत. यामुळे त्यांचा शिवाजी नगर गोवंडी विभागातील अनधिकृत ठेकेदार व दलाल (Agent) त्यांच्या कायम संपर्कात आहे, या अनधिकृत ठेकेदारांनमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामाबाबत चढाओढ सुरु असते, त्यामुळे विभागामध्ये मोठ्या प्रमाणात दलालामध्ये संघर्ष सुरु असतो. यामध्ये सर्वात हुकमी एक्का म्हणून श्री.मोहमद हनीफ शेख यांची मुख्य भूमिका आहे, म्हणजे त्यांच्या मर्जीतील ठेकेदार यांच्या बरोबर आर्थिक देवाणघेवाण करून छुप्या पद्धतीने संरक्षण देणे त्यांना नोटिशी देणे तोडक (निष्कासनाची) कारवाई करीता वेगवेगळी कारणे दाखून तक्रारदार यांची दिशाभूल करणे, तसेच सहाय्यक आयुक्त यांना या विषयाबाबत तक्ररदार, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, राजकीय कार्यकर्ते यांनी बऱ्याच तक्रारी करून देखील तरीपण त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही.संबधित प्रभागात शिवाजी नगर, बैगंनवाडी या विभागात शेकडो अनधिकृत बांधकामे G+2 ,G+3 ची बांधकामे झाली आहेत. व सुरु आहेत यामुळे वसाहत अधिकारी. मोहम्मद हनीफ शेख एम/पूर्व विभागात भ्रष्टाचार, गैरकारभार, आणि प्रशासनातील अपारदर्शकता, तसेच सार्वजनिक हितविरोधी कृत्य करीत आहे,

परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत G+2 आणि G+3 इमारतींची बांधकामे सुरू ठेवण्यासाठी ठेकेदारांना संरक्षण देत आहेत. या बांधकामांवर नोटिसीचा धाक दाखवून ते संबंधित ठेकेदारांना छुप्या पद्धतीने मदत करत आहेत.

सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि राजकीय कार्यकर्त्यांनी यावर तक्रारी दाखल केल्या असून, तरीही कोणतीही कारवाई झाली नाही, असा आरोप आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्हे निर्माण झाला आहे.

तक्रारदारांनी संबंधित अधिकारी मोहम्मद हनीफ शेख यांना सहाय्यक मनपा आयुक्त अलका ससाणे यांच्या विश्वासाचे भ्रष्ट अधिकारी म्हणून पालिका अधिकारीवर्ग यांच्यामध्ये ओळख आहे. त्यांच्यावर मुंबई महापालिका अधिनियम अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांचे निलंबन करून या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी तीव्र मागणी केली जात आहे.

---

# ३३ मोठ्या थकबाकीदारांवर मालमत्ता अटकावणीची धडक कारवाई

### १० जणांकडून ५ कोटी १२ लक्ष वसूली

**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ताकर विभागामार्फत प्रभावी करवसूलीकडे विशेष लक्ष दिले जात असून थकबाकीदारांना आवाहन करून, नोटीस बजावूनही प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांवर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. आत्तापर्यंत नोटीसीला प्रतिसाद न देणाऱ्या ३३ मोठ्या थकबाकीदारांवर मालमत्ता अटकावणीची कारवाई करण्यात आली असून ५ कोटी १२ लक्ष इतकी वसूली रक्कम महापालिकेकडे जमा झालेली आहे.

या करवसूली प्रक्रियेत महापालिका आयुक्त यांचे मार्गदर्शनानुसार १ लाखापेक्षा अधिक रक्कमेचे थकबाकीदार असणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करण्यात आली असून अशा ८ हजार मोठ्या थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. त्वरित भरणा करून शहराच्या विकास प्रक्रियेला हातभार लावण्याचे आवाहन प्रारंभी करण्यात आले होते. त्यानंतर मोठ्या थकबाकीदारांना नोटीसा देण्यात आल्या. आता नोटीसांना प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांविरोधात मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू करण्यात आलेली आहे.



त्यानुसार ६ फेब्रुवारी २०२५ रोजी अमेय को-ऑप. हौ. सोसायटीमधील १ लक्ष रक्कमेहून अधिक थकित मालमत्ताकर असणाऱ्या ६८ व्यापारी गाळ्यांची एकूण थकबाकी रक्कम रू. ५.३२ कोटी इतकी असून त्याच्या वसूलीसाठी सदरचे ६८ व्यापारी गाळे जप्त (सील) करण्यासाठी जप्ती अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर गाळे जप्त करूनही जर त्यांनी ५ दिवसात थकबाकीची रक्कम भरणा केली नाही तर सदर व्यापारी गाळ्यांचा लिलाव करून रक्कम वसूल करण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ताकर हा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असून त्यामधूनच नागरिकांना गुणात्मक सेवासुविधा पुरविल्या जातात. मालमत्ताकरापोटी सन २०२४-२५च्या अर्थसंकल्पात ९०० कोटी रक्कमेचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवण्यात आले असून आत्तापर्यंत ६१७ कोटी इतक्या रक्कमेची वसूली झालेली आहे.

तथापि नोटीसांची मुदत संपूनही प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात येत असून त्या अंतर्गत ३३ थकबाकीदारांवर मालमत्ता अटकावणीची कारवाई करण्यात आलेली आहे. त्यामधील १० थकबाकीदारांनी ५ कोटी १२ लक्ष इतकी रक्कम जमा केलेली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत थकित रक्कम


---

# आरक्षण दिले तरी लोक डबे बदलतात!

## पक्षातून बंडखोरी करणाऱ्यांवर उद्धव ठाकरे यांची टीका

**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

मुंबई - काळ विचित्र असून काहींना पक्षात येण्याआधीच आरक्षण हवे असते. आरक्षण मिळाले तरच मी पक्षात येतो, अशी भूमिका घेतली जाते. पण जरा कुठे 'खुट्ट' झाले की आरक्षण मिळाले तरी लोक डबे बदलतात, गाड्या बदलतात, अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोरी करणाऱ्यांवर टीका केली.



ठाकरे गटाची अधिकृत संघटना 'रेल कामगार सेने'चे राष्ट्रीय अधिवेशन दादर येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाला उपस्थित कामगार सेनेचे कर्मचारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे यांनी बंडखोरांवर टीका केली. रेल कामगार सेना या एका रुळावरून तुमची वाटचाल सुरू आहे. पण अनेकांना आरक्षण दिले तरी लोक डबे बदलतात, तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांचा तसा स्वभाव नाही. त्यामुळे ज्यांना उद्दिष्टचे रूळ नाहीत, ते इकडेतिकडे भरकटत आहेत, असा टोला ठाकरेंनी लगावला. आपल्या न्याय-हक्कांसाठी काही आंदोलने करावीच लागतात, आम्ही संयमी आहोत याचा अर्थ आम्ही भेदरट आहोत नाही, असेही ठाकरे म्हणाले.

दिल्लीकरांनी एक उफराटा निर्णय घेतला आहे. आपली एक ट्रेन गोरखपूरला घेऊन गेले आहेत. गोरखपूरला ट्रेन घेऊन जाण्याबद्दल आमची हरकत नाही, पण आमची हक्काची कोकण ट्रेन जर वळवून तिकडे घेऊन जाणार असाल तर आम्ही पेटून उठल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. देशात इतर ठिकाणी असे घडले आहे का, अहमदाबादची ट्रेन वळवून पाटणाला घेऊन नेली आहे का, असा सवाल करतानाच उलट मुंबईतून जाणाऱ्या सूरतच्या गाड्यांचा मार्ग बंद करायला पाहिजे, कारण त्याचा वाईट अनुभव आम्हाला आहे, अशी मिश्कील टिप्पणी त्यांनी पक्षफुटीवर केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने मुंबईतील टर्मिनसवर महाराजांचा पुतळा कधी उभारणार, असा सवाल करीत शिवसेनेच्या वतीने केंद्र सरकारला जाब विचारा, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. ते जर उभारणार नसतील तर तो पुतळा शिवसेना उभारील, असे ठाकरेंनी स्पष्ट केले. सरकारला छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे 'ईव्हीएम' मशीन वाटत आहे. महाराजांचा फक्त जय जय करायचा आणि मते घ्यायची, पण महाराजांचा जयजयकार केल्यानंतरही आपली आदर्श आणि दैवते केवळ मतांसाठी वापरतात, असा टोलाही त्यांनी लगावला.

# आदर्श राजा तरुणांचे प्रेरणास्थान

**ज्यांच्या इतिहासाची पाने उलटतांना अंगावर काटा उभा राहतो, ज्यांच्या अवघ्या नामघोषाने अंगामध्ये रक्त सळसळते, ज्यांच्या विचारांनी देखील एक नव चैतन्य प्राप्त होते असे, तमाम मराठी मनाचा मानबिंदू, सह्याद्रीच्या माथ्यावर वर्षानुवर्षे तळपणारा क्रांतिसूर्य, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांनी स्वराज्याला अर्पण केलेले युगपुरुष म्हणजे श्री छत्रपती शिवाजी महाराज.**



खरच आज गरज आहे त्या स्फूर्तीची, तमाम मावळ मातीमध्ये रुजवलेल्या त्या दिव्य स्वप्नाची, स्वराज्याच्या स्वप्नाची. सामान्य माणसाच्या स्वप्नातील स्वराज्याची, याच साठी शिवरायांनी जीवनभर एकच वसा घेतला होता तो म्हणजे माणसे घडवण्याचा आणि त्यांना एकत्र जोडण्याचा. आपल्या कर्मानेच आपल्या राष्ट्राची निर्मिती आथवा विकृती सुद्धा होत असते हा विचार त्यांनी स्वराज्यातील लोकांमध्ये खोलवर रुजविला. म्हणूनच तानाजी, बाजीप्रभू, बाजी पासलकर, जिवा महाले असे अनेक ज्यांची इतिहासामध्ये साधी नोंद पण नाही असे लोक स्वराज्या निर्मितीच्या कार्यामध्ये कामी आले. त्या सर्वांच्या मनामधे एकच भावना होती ती म्हणजे-स्वराज्य निर्मिती हे आमचे कार्य आहे आणि आमचे प्राण गेले तरी बेहत्तर पण स्वराज्याची घौडदौड, शिवबाची घौडदौड कधी ही थांबली नाही पाहिजे! आज आपण पण हीच गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपल्याला काही बदल हवा असल्यास तो बदल आपणच घडवून आणला पाहिजे. लोकसभा किंवा विधानसभेमध्ये बदल घडवून आपल्या देशाचे भवितव्य बदलणार नाही; त्यासाठी गरज आहे आपल्याला बदलण्याची, आपले विचार बदलण्याची, आपल्या विचारणा एक योग्य दिशा देण्याची.



देशाची कमान जो पर्यंत एक दिशा आणि दूरदृष्टी असलेल्या तरुणांकडे असणार नाही तो पर्यंत या देशाला साक्षात ब्रम्हदेव सुद्धा वाचवू शकणार नाही. काळ फार कठीण आहे मित्राणो, गरज आहे आता आपल्यालाच पेटून उठण्याची, डोळ्यात तेल घालून आपल्या देशाची, भाषेची आणि आपल्या संस्कृतीची सुरक्षा करण्याची; गरज आहे मानसिक गुलामगिरीतून मुक्त होण्याची!

शिव चरित्रा सारखा धगधगता दिपस्तंभ समोर असताना हे कार्य कठीण नाही, छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श माननारा कधीच कुठल्याही प्रकारच्या गुलामगिरी मध्ये असूच शकत नाही, त्याच्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि स्वाभिमान असतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थीतमध्ये सुद्धा निराश न होता संकटातून बाहेर पडण्याची ताकत त्याच्यामध्ये असते. शिवाजी महाराज आज येणार नाहीत, आणि कधी आले तरी ते तुमच्या आमच्या हातामध्ये ढाल-तलवार देणार नाहीत, आजचे युद्ध आहे ते ज्ञानाचे, विचारांचे, संगणक आणि माहिति तंत्रज्ञानाचे. शिव चरित्रातून प्रेरणा घेऊन आपण आपल्यातला मी पणा सोडून, आजच्या या स्पर्धात्मक युगात कला, क्रीडा, विज्ञान, संस्कृती, भाषा, प्रशासन अशा अनेक क्षेत्रामधले विविध गड जिंकून आपल्याला एका उज्वल आणि बलवान भारत देशाची निर्मिती करायची आहे आजचा लढा हा ताकदीचा नसून तो ज्ञानाचा आहे, विचारांचा आणि बुद्धीचा आहे. त्यामुळे तमाम तरुणांनी ज्ञांनाच्या पातळीची ही लढाई जिंकणे आवश्यक आहे. झेंडे घेऊन कुठल्याही राजकारण्यांच्या मागे फिरून आपला अमुल्य वेळ वाया घालू नये. शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळातील गरज ओळखून स्वराज्य हिताचे कार्य केले. मात्र आपल्याला आजच्या काळातील गरज ओळखून पुढे जायचे आहे. आज देशातीलच नव्हे तर जगातील प्रत्येक माणूस शिवाजी महाराजांचा आदर करतात. शिवरायांच्या जीवनावर खूप चित्रपट, पोवाडे, नाटके, गाणी, बनवली गेली. खूप अशी ठिकाणे, संग्रहालये, स्टेडियम्स, शिवाजी राजांच्या नावाने नावाजली गेली. मुंबई मधील विमानतळाला देखील शिवाजी महाजारांचं नाव देण्यात आलं. शिवजयंती आपण खूप खूप उत्साहात साजरी करतो. लेझीमच्या तालावर शिवाजी महाराजांची पालखी मिरवणूक निघते, एकमेकांना शिवाजी महाराजांचे फोटोस, व्हिडिओस सोसिअल मीडियावर पाठवले जातात.

मुंबईमध्ये शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम जोमात सुरु आहे. शिवाजी महाराजांचा २१० फुटांचा हा पुतळा जगातील सर्वाधिक उंच पुतळा असेल. हे स्मारक बांधण्यासाठी ४००० करोड इतका खर्च येणार आहे. परंतु राजांचा इतिहास गड किल्ल्यातून जीवंत आहे. त्यांचे नूतनीकरण व डागडुजीसाठी करणे आवश्यक आहे. शिवाजी महाराज एक उत्कृष्ट राजा, धर्मनिरपेक्ष राज्यकर्ते आणि दूरदृष्टी असणारे योद्धा होते. ते जनतेच्या कल्याणासाठी लढत राहिले म्हणूनच त्यांना रयतेचा राजा म्हणतात. जर आज शिवाजी महाराज जिवंत असते तर ह्या जनतेचं त्याच्याबद्दलच प्रेम बघून भारावून गेले असते. राजांच्या कार्यामुळे आज प्रत्येक माणूस अभिमानाने स्वाभिमानाने ताठ मानेने जगत आहे. म्हणूनच स्वाभिमानाच्या सूर्याला, पर्वतासारख्या खंबीर राजाला, जिजाऊच्या सिंहाला आणि त्याच्या कर्तुत्वाला मानाचा मुजरा!

# म्हाडाच्या नाशिक मंडळाच्या ४९३ घरांसाठी मार्चमध्ये सोडत

### २० टक्के योजनेतील घरांसाठी दोन ते तीन दिवसांत जाहिरात

मुंबई - म्हाडाच्या नाशिक मंडळाकडून ४९३ घरांसाठी सोडत काढण्याचा निर्णय घेण्यात आला असून २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ही घरे असून या घरांसाठी दोन ते तीन दिवसांत जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तर ७ फेब्रुवारीपासून सोडतपूर्व प्रक्रियेला अर्थात नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.




सर्वसामान्यांना म्हाडाच्या माध्यमातून परवडणाऱ्या दरात खासगी विकासकाच्या प्रकल्पातील अत्याधुनिक सोयीसुविधा असलेली घरे उपलब्ध व्हावीत यासाठी राज्य सरकाने २० टक्के सर्वसमावेशक योजना आणली आहे. त्या योजनेनुसार मुंबई वगळता १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या पालिका क्षेत्रातील ४००० चौ. मीटरपेक्षा अधिक बांधकाम असलेल्या गृहप्रकल्पातील २० टक्के घरे आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. ती घरे म्हाडाच्या माध्यमातून सोडत काढून विकासकाच्या माध्यमातून विजेत्यांना वितरीत केल्या जातात. असे असताना नाशिकमधील विकासकांकडून मात्र २० टक्क्यातील घरे म्हाडाला देण्यास टाळाटाळ केली जात आहे. ही योजना आपल्याला कशी लागू होणार नाही यासाठी विकासकांकडून पळवाटा शोधल्या जात आहेत. असे असले तरी म्हाडा आणि नाशिक मंडळ विकसकांकडून २० टक्क्यांतील घरे मिळावीत यासाठी पाठपुरावा करत आहे. त्यानुसार नाशिक मंडळाला ४९३ घरे उपलब्ध झाली आहेत. त्या घरांसाठी जानेवारीत सोडत काढण्यात येणार होती. पण काही कारणाने या सोडतीस विलंब झाला आहे. पण आता मात्र या सोडतीची तयारी अंतिम टप्प्यात असून दोन ते तीन दिवसात ४९३ घरांच्या सोडतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. येत्या दोन ते तीन दिवसांत जाहिरात प्रसिद्ध करून ७ फेब्रुवारीपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात केली जाण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी सांगितले. महिनाभर सोडतपूर्व प्रक्रिया राबवून मार्चमध्ये घरांसाठी सोडत काढली जाणार आहे. २० टक्के योजनेतील ही ४९३ घरे मोठ्या संख्येने अल्प गटातील असून काही घरे अत्यल्प गटातील आहेत. एक आणि दोन बीएचकेची ही घरे असून २९.९७ चौ.मीटर ते ४९.९६ चौ. मीटर क्षेत्रफळापर्यंतची ही घरे आहेत. अवध युटोपिया, मखमलाबाद येथील अत्यल्प आणि अल्प गटातील घरांसह सातपूर साई पार्क, यशोदा अपार्टमेंट पाथर्डी शिवार, अर्पण हाऊसिंग व्हिटागाव शिवार, जगन्नाथ हाइटस म्हासरूळ शिवार, रामबाग नाशिक शिवार, गणेश आरंभ पिंपळगाव, तुळसीबाग देवळाली यासह आदी प्रकल्पातील ही ४९३ घरे आहेत. या घरांच्या किंमती १२ लाख रुपये ते २५ लाख रुपयेदरम्यान आहेत. इच्छुकांनी आता कागदपत्रे जमा करून नोंदणी आणि अर्ज भरण्याच्या तयारीला लागावे असे आवाहन नाशिक मंडळाकडून करण्यात आले आहे.


# नगर विकास विभाग महाराष्ट्राच्या विकासाचा कणा- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



पुणे - शहरी आणि ग्रामीण भागाचा सुनियोजित विकास करण्याचे काम नगर विकास विभागाच्यावतीने करण्यात येते; विभागाचे अधिकारी-कर्मचारी शहरी आणि ग्रामीण भागातील नगररचनेचे खऱ्या अर्थाने शिल्पकार आहेत, त्यामुळे नगर विकास विभाग हा महाराष्ट्राच्या विकासाचा कणा आहे, असे प्रतिपादन असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

नगरविकास, नगर रचना आणि मूल्य निर्धारण विभागाच्यावतीने आयोजित गुणवंत अधिकारी व कर्मचारी पुरस्कार वितरण समारंभप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव इंजि. असीम गुप्ता, नगर रचना संचालक अविनाश पाटील, डॉ. प्रतिभा भदाणे, सुलेखा वैजारपूरकर, सुनील मरळे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरिकरण असलेले राज्य आहे, शहरी भागातील वाढती लोकसंख्या, पर्यावरणाची हानी, वाढते प्रदूषण, पिण्याचे पाणी आदी आव्हाने स्वीकारुन नगर रचना विभागाने पायाभूत सुविधा निर्मितीबाबतचे नियोजन करावे. शहराचा गतिमान विकास करताना तो सर्वसमोवशक, सुनियोजित आणि शाश्वत असला पाहिजे. तापमान वाढ, हवामान बदलांचा विचार करुन शहरी व ग्रामीण भागाचा पर्यावरणपूरक विकास करावा लागेल. मलनिःसारण प्रकल्पांतर्गत प्रक्रिया केलेले पाणी बागबगीचा, औद्यागिक क्षेत्र तसेच बांधकामाकरिता वापर करणे बंधनकारक करण्यातबाबतचा निर्णय घ्यावा लागेल.


१९
फेब्रुवारी
छत्रपती
श्री शिवाजी
महाराज
यांना जयंतीनिमित्त
मानाचा मुजरा!
शुभेच्छुक
बाळकृष्ण जाधव
संपादक – जागता महाराष्ट्र आणि जागता महाराष्ट्र परिवार

# मुंबई महापालिकेचा ७४ हजार कोटींचा अर्थसंकल्प सादर

## आगामी अर्थसंकल्पात १४ टक्क्यांनी वाढ



**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

मुंबई - मुंबई महानगरपालिकेचा २०२५-२६ या आर्थिक वर्षातील ७४४२७.४१ कोटी रूपयांचा अर्थसंकल्प अतिरिक्त महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी मंगळवार, ४ फेब्रुवारी रोजी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे सादर केला. चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत आगामी अर्थसंकल्पाचे आकारमान ९२४६.६२ कोटी रुपयांनी अधिक असून आगामी अर्थसंकल्प १४.१९ टक्क्यांनी अधिक आहे. विविध विकास कामांसाठी ४३१६५.२३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षात सुशोभिकरण, रस्त्यांचे सुरू असलेले कॉंक्रीटीकरण, त्याचबरोबर हाती घेतलेल्या मोठ्या प्रकल्पांसाठी महापालिकेला मोठा निधी खर्च करावा लागला आहे. महापालिकेच्या ठेवी त्यासाठी मोडाव्या लागल्या होत्या. ही बाब लक्षात घेऊन महसूलवृद्धीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

मुंबई महानगर पालिकेचा अर्थसंकल्प अतिरिक्त आयुक्त आयुक्त भूषण गगराणी यांनी सादर केला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे बजेट ७४ हजार ४२७ कोटी इतके आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत १४.१९ टक्के वाढ आहे. २०२४-२५ च्या बजेटमध्ये ६५ हजार



१८० कोटींच्या तरतुदी करण्यात आल्या होत्या. कचरा संकलन कर संदर्भात अद्याप निर्णय नाही, कायदेशीर सल्ला घेऊन निर्णय घेणार असल्याची माहिती आहे.

### मुंबई पर्यटनवाढीसाठी महापालिकेच्या नव्या योजना

– राणी बागेचे नवे आकर्षण म्हणून राणी बागेत पेंग्वीन आणि वाघांनंतर जिराफ; झेब्रा; सफेद सिंह; जॅग्वार या विदेशी प्रजातीचे प्राणी आणले जाणार आहेत.

– मुंबई शहरातील कोळीवाड्यांच्या विकासासाठी २५ कोटी देण्यात येणार आहेत.

– संजय गांधी नॅशनल पार्क च्या जमिनीखालील बोगद्यात वाघाचे शिल्प उभारले जाणार आहेत.

– लंडन आयच्या धर्तीवर मुंबई आय उभारले जाणार आहेत.

– काळा घोडा आणि रिगल जंक्शन परिसराचा विरास केला जाणार आहे.

### कोणत्या कामासाठी किती खर्चाची तरतूद

- रस्ते व वाहतूक खात्याकरिता २०२५-२६ या अर्थसंकल्पीय अंदाज मध्ये ५१०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- दहिसर ते भाईंदर पर्यंतच्या कोस्टल रोड प्रकल्प करिता २०२५-२६ चा अर्थसंकल्पीय अंदाज मध्ये ४३०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
- गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाकरिता १९५८ कोटी इतकी तरतूद केलीय.
- मुंबई महापालिका आरोग्य खात्याचे बजेट ७३७९ कोटी आहे.
- मुंबई महापालिका शिक्षण खात्याचे यंदाच्या वर्षीच बजेट ३९५५ कोटी रुपये असेल.
- मिशन व्हिजन २७, मिशन संपूर्ण हे दोन मिशन मुंबई महापालिकेच्या शिक्षण खात्याकडून राबवले जाणार आहेत.
- मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर झोपडपट्टीतील गाळेधारकांना मुंबई महापालिका कर भरावा लागणार आहे.
- झोपडपट्टीतील व्यावसायिक गाळेधारकांना कर लागणार आहे. झोपडपट्टीतील गाळेधारकांकडून सुमारे ३५० कोटी इतका महसूल अपेक्षित आहे.
- मुंबई महापालिकेत अडीच लाख झोपडपट्ट्या, त्यातील २० टक्के झोपडपट्ट्यांमध्ये उद्योगधंदे दुकाने गोदाम हॉटेल्स अशा व्यवसायिक कारणासाठी वापर करण्यात येतो. या व्यवसायिक गाळेधारकांना कर निर्धारण करून मालमत्ता कर मुंबई महापालिका वसूल करणार आहे. यातून सुमारे ३५० कोटी इतका महसूल प्राप्त होणे अपेक्षित आहे.

# ३९ लाख मतदार सगळीकडे फिरणार

## महाराष्ट्र पॅटर्न आता दिल्ली, बिहारमध्ये राबवणार

नवी दिल्ली - निवडणूक आयोग सरकारची गुलामी करते. आम्ही वारंवार राज्य निवडणूक आयोग आणि केंद्रीय निवडणूक आयोगासमोर आमचे डोके फोडले. ३९ लाख मतदार कुठून आले आणि कुठे जाणार, आता हे ३९ लाख मतदार बिहारला जाणार. नावे तीच राहणार, आधार कार्ड तीच राहणार, फक्त ते मतदार फिरत राहणार. काही दिल्लीत आले, काही बिहारला जातील.

महाराष्ट्र पॅटर्न दिल्ली, बिहार मग उत्तर प्रदेशातही राबवणार अशा शब्दात ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपावर निशाणा साधला आहे. दिल्लीत राहुल गांधी, संजय राऊत आणि सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते. संजय राऊत म्हणाले की, ३९ लाख मतदार बिहारला जाणार, त्यानंतर उत्तर प्रदेशात जाणार. हा एक नवीन पॅटर्न बनला आहे. याच पॅटर्नने निवडणूक लढवली जाते आणि जिंकली जाते. राहुल गांधींच्या नेतृत्वात आम्ही प्रश्न उभे केलेत. देशात लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर या प्रश्नांची उत्तरे माध्यमांनी विचारली पाहिजे. लोकांमध्ये जागरुकता आली पाहिजे. आम्ही लढत राहू. आम्हाला महाराष्ट्रात हरवले गेले, हा मुद्दा देशासमोर राहुल गांधींनी आणला. लोकांनी उठाव करून या प्रश्नांची उत्तरे विचारली पाहिजे असे त्यांनी सांगितले. तर महाराष्ट्राच्या निवडणुकीत मतदार याद्यांवर प्रश्न उभे राहतात. दरवर्षी जितके मतदार यादीत नोंदवले जातात त्याहून अधिक फक्त ५ महिन्यात नोंदणी केली. अतिरिक्त मतदार वाढवले हे कोण आहे, ते कुठून आले. महाराष्ट्राची वयस्क लोकसंख्या सरकारच्या आकडेवारीनुसार ९.५४ कोटी आहे. महाराष्ट्रात लोकसंख्येपेक्षा अधिक मतदार कसे वाढले, कामठी विधानसभेत १.६३ लाख मते लोकसभेला कॉंग्रेसला मिळाली, विधानसभेलाही तितकेच मतदान झाले. मात्र या मतदारसंघात ३५ हजार मते वाढली आणि ती सगळी भाजपाच्या खात्यात गेली आणि भाजपा निवडणूक जिंकली. अशी अनेक उदाहरणे आहेत. महाराष्ट्रात आमची मते कमी झाली नाहीत, भाजपाची मते वाढली आहेत. जिथे भाजपाचा स्ट्राईक रेट ९० टक्क्याहून अधिक आहे तिथे मतदार वाढले आहेत असा आरोप कॉंग्रेस नेते राहुल गांधींनी केला.

# पैसे द्या, आयकर सेटलमेंट करतो!

## आयकर विभागाच्या तीन अधिकाऱ्यांसह सहा सीए विरोधात गुन्हा

मुंबई - आयकर अधिकारी आणि करदाते यांचा थेट संबंध येऊ नये, यासाठी विकसित करण्यात आलेल्या फेसलेस स्कीममधील करदात्यांची माहिती चार्टर्ड अकौंटंटच्या माध्यमातून करदात्यांपर्यंत पोहोचवत त्यांच्याकडून लाचखोरी करणारा आयकर विभागाचा उपायुक्त, दोन आयकर निरीक्षक यांच्यासह सहा चार्टर्ड अकौंटंटच्या विरोधात सीबीआयच्या आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी सीबीआयने गुरुवारी मुंबई, ठाणे, दिल्ली, चंपारण, बंगळुरू, कोट्टायम येथे एकूण १८ ठिकाणी छापेमारी केली. या छाप्यांदरम्यान पैशाच्या देवाणघेवाणीच्या नोंदी आणि काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे सीबीआय अधिकाऱ्यांनी जप्त केली आहेत. विजयेंद्र आर. असे आयकर विभागाच्या उपायुक्ताचे नाव आहे. २०१५ च्या बॅचचा भारतीय महसूल सेवेचा तो अधिकारी आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विजयेंद्र आर. आणि दोन निरीक्षकांकडे ज्या मोठ्या करदात्यांची प्रकरणे होती, त्यांनी त्या करदात्यांची माहिती दिनेश अगरवाल याला दिली. दिनेश अगरवालने सहा चार्टर्ड अकौंटंटच्या माध्यमातून अशा करदात्यांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. तुमच्या प्रकरणात आम्ही सेटलमेंट करून देऊ शकतो, त्या बदल्यात आम्हाला पैसे द्या, असे सांगत त्यांनी हा गैरव्यवहार सुरू केला. २०२२ ते २०२४ अशा दोन वर्षांच्या कालावधीत त्यांनी अनेक मोठ्या करदात्यांना फोन करत त्यांची सेटलमेंट करून दिल्याचे सीबीआयच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

# सूर्योदय युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याच्या विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

## महाराष्ट्र राज्यात सूर्योदय युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून दौरा – सत्यवान गायकवाड



**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

नवी मुंबई - सूर्योदय युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याच्या विविध पदांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये संकेत संजय निवडुंगे (प्रदेश उपाध्यक्ष), सुनील रमेश पगार (प्रदेश सचिव), स्वाती सत्यवान गायकवाड (प्रदेश खजिनदार), अक्षय कुऱ्हाडे (प्रदेश सहखजिनदार), तसेच सदस्य पदी प्रणय कांबळे, सतीश कडव यांची नियुक्ती करण्यात आली असून सूर्योदय युवा प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सत्यवान गायकवाड यांनी सर्व नियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती केली.

भविष्यात संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रामध्ये संस्थेच्या माध्यमातून कार्य केले जाणार असून भविष्यात विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील गरजू पर्यंत पोहचण्याचा मानस असल्याचे संस्थेचे अध्यक्ष सत्यवान गायकवाड यांनी सांगितले. तर, येणाऱ्या काळात महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातून तालुक्यातून पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असून याबाबत, मोर्चे बांधणी करण्यासाठी सत्यवान गायकवाड आणि नवनियुक्त पदाधिकारी लवकरच महाराष्ट्र भर दौरा करून जे नागरिक संस्थेसोबत सामाजिक क्षेत्रात कार्य करण्यास इच्छुक आहे. त्यांची भेट घेऊन महाराष्ट्रभर संस्थेच्या माध्यमातून कार्य केले जाणार असल्याचेही सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हा तसेच, तालुक्यातून विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करण्यास इच्छुक असणाऱ्या नागरिकांनी संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्जाचा ईएमआय होणार कमी!

## करमुक्तीनंतर आता आरबीआयकडून रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात

मुंबई - भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज शुक्रवारी (दि. ७) कर्जदारांना मोठा दिलासा दिला. त्यांनी रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात केल्याचा निर्णय जाहीर केला. यामुळे आता रेपो दर आता ६.५ टक्क्यांवरून ६.२५ टक्क्यांवर आला आहे. विशेष म्हणजे जवळपास पाच वर्षांनंतर रेपो दरात केलेली ही पहिलीच कपात आहे. तर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची ही पहिलीच पतधोरण बैठक आहे.

पतधोरण समितीने रेपो रेट २५ बेसिस पॉइंट्सनी कमी करण्याचा निर्णय एकमताने घेतला आहे. यामुळे रेपो रेट आता ६.५ टक्क्यांवरून ६.२५ टक्क्यांवर आला असल्याची माहिती आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी पत्रकार परिषदेत दिली. महागाईवाढ लक्ष्यीकरणाबाबत रुपरेखा आखल्यानंतर सरासरी महाईवाढ कमी झाली आहे, असे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले. अर्थव्यवस्थेच्या हितासाठी आर्थिक स्थिरता आणि ग्राहक संरक्षण आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

आरबीआयच्या पतविषयक धोरण समितीची बैठक ५ फेब्रुवारी रोजी सुरू झाली होती. त्यानंतर आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दोन दिवसांच्या पतधोरण बैठकीनंतर रेपो दराबाबतचा निर्णय जाहीर केला.

महागाई कमी झाली असून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ती आणखी कमी होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. अन्नधान्याच्या अनुकूल परिस्थितीमुळे महागाई कमी झाली आहे. निश्चित्य लक्ष्यानुसार ती हळूहळू आणखी कमी होणे अपेक्षित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

# आता ‘त्या’ लाडक्या बहिणींचा अर्ज थेट होणार बाद

## अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन करणार पडताळणी

पुणे - राज्यातील लाडकी बहीण योजनेतील महिला लाभार्थी सुमारे अडीच कोटींपर्यंत पोहचल्या असून, यामध्ये निकषांची पूर्तता न करणाऱ्या महिलांची संख्या अधिक असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. महिला व बालकल्याण विभागाने निकषात न बसणाऱ्या महिलांना अपात्र करण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. योजनेचे खरे लाभार्थ्यांना लाभ मिळावा आणि सरकारने निवडणुकीत दिलेल्या २१०० रुपयांच्या आश्वासनाची अंमलबजावणी करताना तिजोरीवर अधिक बोजा न येईल, यासाठी सरकारने खबरदारी घेण्याची चर्चा विभागात सुरू आहे.

आता यासाठी अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. लाडक्या बहिणींच्या घरी चारचाकी असेल तर आता ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेचा लाभ सोडावा लागणार आहे, कारण (मंगळवारपासून ता. ४) घरोघरी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका पडताळणी करणार आहे. चारचाकी वाहन तुमच्या कुटुंबीयांच्या नावावर असल्याचे



पडताळणीत निष्पन्न झाले, तर तुम्हाला थेट अपात्र करण्यात येणार आहे.

पुण्यामधील २१ लाख ११ हजार ९९१ बहिणींनी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केला होता. त्या सर्व महिलांच्या घरी चारचाकी आहे, का याची पडताळणी केली जाणार आहे, त्यानंतर चारचाकी असलेल्या बहिणी अपात्र ठरणार आहेत. महिला व बालकल्याण विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव यांनी काल (सोमवारी ता. ३) ऑनलाईन बैठक घेत राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना ‘लाडक्या बहिणींच्या’ घरी जाऊन चारचाकी वाहन आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच परिवहन विभागाकडून वाहनधारकांची यादी घेऊन ती प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुटुंबातील सासरे, दीर अथवा घरातील इतरांच्या नावावर चारचाकी असेल आणि लाभार्थी महिला पती, मुलांसोबत विभक्त (वेगळी) राहत असेल, तर त्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ सुरू राहणार आहे.

# सायबर गुन्हेगारांचे पैसे अशिक्षित, बेरोजगारांच्या खात्यात

## भिवंडी शहरातून सायबर गुन्हे करणारी टोळी गजाआड

ठाणे - सायबर गुन्हे करून पोलिसांच्या तावडीत सापडू नये यासाठी फसवणूकीचे पैसे बेरोजगार, अशिक्षितांच्या खात्यात वळवून पुन्हा ती रक्कम आपल्या खात्यात वळते करणाऱ्या एका टोळीला शांतीनगर पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईत तिघांना अटक केली आहे. तर दोन अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अवघ्या महिन्याभरात त्यांनी नागरिकांची ३५ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. फसवणूकीची रक्कम आणखी वाढण्याची शक्यता असल्याने याप्रकरणाचा तपास शांतीनगर पोलिसांकडून सुरू आहे.

अब्दुल अन्सारी (२३), आतिक अन्सारी (२०) आणि मोहम्मद अन्सारी (२०) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे असून १७ वर्षीय दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून १२ मोबाईल, वेगवेगळ्या बँक खात्याचे १२ डेबिट कार्ड, १७ धनादेश, बँक खातेपुस्तिका आणि पॅनकार्ड पोलिसांनी जप्त केले आहे. भिवंडीतील फातमानगर परिसरातील एका घरामध्ये बसून टोळी नागरिकांची ऑनलाईन फसवणूक करत असल्याची माहिती शांतीनगर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, शांतीनगर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून अब्दुल, आतिक, मोहम्मद यांच्यासह पाच जणांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून जप्त केलेल्या मोबाईल आणि बँक खात्याच्या माहिती घेतली. त्यानंतर पोलिसांनी राष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल (एनसीसीआरपी) या संकेतस्थळावरील माहिती तपासली असता, फसणूकीची रक्कम ते बिहार, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू येथील नागरिकांच्या बँक खात्यात पाठवित होते. हे पैसे ही टोळी डेबिट कार्ड किंवा धनादेशाद्वारे त्यांच्या मोहक्याच्या खात्यात वळते करत होते.

# सिडकोची अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई



नवी मुंबई - सिडकोने अनधिकृत बांधकामांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला असून, मंगळवारी कोपरगावातील रमेश म्हात्रे यांनी उभारलेली चार मजल्यांची बेकायदा इमारत अवघ्या तासाभरात जमीनदोस्त केली. यावरून या इमारतीचे बांधकाम किती दर्जाहीन होते, हे स्पष्ट होत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अशा बेकायदा इमारतीत घरे विकत घेऊन स्वतःचा आणि आपल्या परिजनांचा जीव धाक्यात घालू नये, असे आवाहन सिडकोने केले आहे.

नवी मुंबईतील अनधिकृत बांधकामांची राज्यभर चर्चा आहे. रातोरात इमारती उभारल्या जात आहेत. त्यामुळे त्याचा दर्जाही अत्यंत निकृष्ट असल्याचे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे.

कोपरगावातील पाचमजली इमारतीवर कारवाई केली. बुलडोझरच्या एका फटक्यात धुळीचा लोट उडाला आणि ही इमारत जमीनदोस्त झाली. यावरून या इमारतीच्या बांधकामाचा दर्जा लक्षात येतो. शहरात अशाच प्रकारे अनेक इमारती उभारल्या जात आहेत. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता असल्याने, येत्या काळात आक्रमकपणे कारवाई मोहीम राबविणार असल्याचे सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी स्पष्ट केले.

# श्री क्षेत्र आळंदी येथे भाविक-भक्त व वारकऱ्यांनी घेतला महाप्रसादाचा लाभ









**रंगनाथ जाधव/सुभाष जाधव**

आळंदी - सालाबादप्रमाणे यावर्षीही हराळे वैष्णव धर्मशाळ आळंदी येथे पौष एकादशीला फराळ आणि पौष द्वादशी-वारसीला श्री संत हराळे वैष्णव समाज बारस, आळंदी (देवाची), श्री समस्त जाधव समाज मंडळी, मु. पो. अवसरी, बु.।। ता. आंबेगाव, जि. पुणे यांच्या वतीने अन्नप्रसादाचे आयोजन केले होते. यावेळी अनेक भाविक-भक्तांनी, वारकऱ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच दिनांक २५/१/२०२५ रोजी खिचडी व चहा व फराळ पाण्याची उत्तम सोय केली होती. संध्याकाळी हरिपाठ व पुन्हा चहा वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन जयवंत मानकर चोपदार, अकुंश चव्हाण, चोपदार खाडे महाराज विजेकरी यांनी चांगले नियोजन केले होते. तसेच रात्री १० ते १२ वाजता जागर व भजनाचा कार्यक्रम झाला. पौष द्वादशीला पुजारी नारायण गाडेकर यांनी संतोष राऊत व विश्वनाथ राऊत परिवाराच्या हस्ते हराळ वैष्णव धर्मशाळा आळंदीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज, गोविंद बाबा महाराज, दत्तगुरु विठ्ठल-रुक्मिणी संत रोहिदास दल गुरु कृष्ण, महाराजांची पूजा करण्यात आली. तसेच नैवेद्य दाखविण्यात आला. याप्रसंगी बहुसंख्येने भाविक-भक्त, जाधव मंडळी अवसरी बुद्रुक, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे मुंबई उपस्थिती होती. दुपारी जाधव मंडळांची मिटिंग संपन्न झाली.

# आता 'चेहरा' दाखवूनच मंत्रालयात मिळणार प्रवेश

## एफआरएस तंत्रज्ञानामुळे पारदर्शकतेत होणार वाढ

**जागता महाराष्ट्र/प्रतिनिधी**

मुंबई - मंत्रालयामध्ये प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या फेस डिटेक्शनवर आधारित एफआरएस तंत्रज्ञानामुळे मंत्रालयाच्या सुरक्षिततेमध्ये वाढ होण्याबरोबरच शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गती येण्यात मदत होणार आहे. शासकीय अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी या सर्वांना या प्रणालीसाठीची आवश्यक नोंदणी करून घ्यावी लागणार आहे.

या प्रणालीमुळे मंत्रालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची ओळख सुनिश्चित होणार आहे. अनधिकृत प्रवेशाला चाप बसणार आहे. तसेच, मंत्रालयातील गर्दीवर नियंत्रण येऊन शासकीय कामकाजात अधिक सुलभता येऊ शकेल. अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी यांच्या प्रवेशासाठी फेस डिटेक्शनसंदर्भातील नोंदणी करणे आवश्यक राहील. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या फेस रीडिंग संदर्भातील आवश्यक डेटा हा तातडीने अपलोड करण्याच्या सूचना दिल्या आहेत.




### १०,५०० कर्मचाऱ्यांचा तपशील सादर

**माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त मंत्रालयातील १० हजार ५०० अधिकारी/कर्मचारी यांचा तपशील सदर प्रणालीमध्ये सादर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने कार्यान्वयन कंपनीमार्फत सर्व प्रवेशद्वारांवर फेशियल रिकग्निनेशन यंत्रणा प्रस्थापित करण्यात आली आहे. जानेवारी २०२५ पासून मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी यांना फेशियल रिकग्निनेशन व आरएफआयडी कार्ड आधारित प्रवेश देण्यात येत आहे. अभ्यागतांना तसेच क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांना डीजी प्रवेश या ॲप आधारित ऑनलाइन प्रणालीमार्फत मंत्रालय प्रवेश देण्यात येणार आहे.**

## मिसेस इंडिया ड्रीम्स 2025 सौंदर्य स्पर्धा:

# सुंदरता आणि सशक्तिकरणाचा सुंदर मिलाप



नवी मुंबई - मिसेस इंडिया ड्रीम्स २०२५ चे भव्य समारोप नवी मुंबई येथील काउंटी इन आणि सुइट्स बाय रेडिसनमध्ये संपन्न झाले, ज्यात अनेक उत्कृष्ट महिलांनी भाग घेतला आणि त्यांचा आत्मविश्वास आणि शक्ती दाखवून सर्वांचे मन जिंकले.

हे कार्यक्रम ब्राइट गार्ड फोर्सच्या एक उपक्रम, ब्राइट स्किल्स अकादमीने आयोजित केले होते. समारोप समारंभात अनेक प्रसिद्ध न्यायाधीश उपस्थित होते, ज्यात श्री बलदेव सिंह (निदेशक, ब्राइट गार्ड फोर्स), डॉ. विक्रम पारिख (अध्यक्ष), फराह तितीना (मॉडेल आणि अभिनेत्री), आणि प्राजक्ता मलगांवकर (मुख्य डिझायनर) यांचा समावेश होता. मिसेस इंडिया ड्रीम्स २०२५ च्या विजेत्या होत्या - जिनल कोलेकर, पहिला रनर अप - श्वेता सिन्हा, आणि दुसरा रनर अप-आशु चोबे. कार्यक्रमाच्या आयोजक मनदीप कौर यांनी सांगितले, 'मिसेस इंडिया ड्रीम्स २०२५ एक उत्सव आहे जो महिलांच्या शक्ती, आत्मविश्वास आणि सशक्तिकरणाचा सुंदर मिलाप आहे. जिथे महिलांना त्यांचा आत्मविश्वास दुसऱ्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी साहस देतो. ही सौंदर्य स्पर्धा भविष्यात देखील आयोजित केली जाईल.

हा कार्यक्रम केवळ स्पर्धकांच्या सौंदर्याचे प्रदर्शन करत नाही, तर त्यांची अंतर्निहित शक्ती आणि समाजात बदल घडवून आणण्याची इच्छा देखील दर्शविते. ब्राइट स्किल्स अकादमी, मनदीप कौर यांच्या नेतृत्वाखाली महिलांना पुढे जाण्यास आणि इतरांना प्रेरित करण्यासाठी हे मंच प्रदान केले आहे. यावेळी वन गुड डिजिटलचे कीर्ती कुमार उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक **बाळू सावळेराम जाधव** यांनी संमित्र ऑफसेट प्रिंटर्स, २०१, भायखळा सर्व्हिसेस इंडस्ट्रिज, दादाजी कोंडदेव क्रॉसलेन, भायखळा, मुंबई - ४०००२७ येथे छापून आदर्श नगर, रुम नंबर. एम/जी ५४,१/२, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई- ४०००७४, मो. ९१३७७७८०६४ येथून प्रकाशित केले आहे. **विभागीय कार्यालय:** सेक्टर ३६, खारघर, नवी मुंबई - ४१० २१०.
**या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मताशी/संपादक संचालक सहमत असतीलच असे नाही ( मुंबई - न्यायकक्षेत ).**
**संपादक : बाळकृष्ण जाधव - मो. ९१३७७७८०६४** Email: jagtamaharashtra@gmail.com, **RNI No. - MAHMAR/2009/30923**